सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

**(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६ अ करीता )**

क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३(पदोन्नती-२०२३)/१०९/२०२३ मुंबई, दिनांक :- ३०/०९/२०२४.

**वाचा:-** १) शासन निर्णय सा.प्र.विभाग क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दि.०१/०८/२०१९

२) महसुली विभाग वाटप नियम-२०२१, दि.१४/०७/२०२१

३) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१

४) शासन पत्र गृह विभाग क्र. संकीर्ण-०६२०/प्र.क्र.२७६/पोल-५ब, दि.२८/०९/२०२०

५) महाराष्ट्र पोलीस नियमावली, भाग-१, १९५९ मधील नियम ३३ व ५६(३)

६) गृह विभाग क्रमांक पीएमएन - ०६२२ / प्र.क्र.३७० / पोल - ५ ब, दि.२८/०६/२०२२

७) या कार्यालयाचे समक्रमांक दि.०९.०९.२०२४ चे ज्ञापन.

## -: आदेश :-

विभागीय अर्हता परीक्षा उत्तीर्ण असलेल्या व निवडसूची सन २०२३-२४ वर विभागीय पदोन्नती समितीने बैठक दि.०४.१२.२०२३ रोजी पात्र केलेल्या उर्वरित १२३ पोलीस अंमलदारांना स्थानापन्न २५ टक्के कोट्यातून पदोन्नतीने पदस्थापना देण्याकरिता १२३ पोलीस अंमलदारांकडून महसुली विभाग पसंतीक्रम प्राप्त झालेले आहेत.

२. उक्त नमूद १२३ अंमलदारांपैकी सपोउनि/८४३ ज्ञानेश्वर नामदेव आवाळे, पुणे शहर हे दि.३०.०९.२०२४ रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त होत असून, ते सध्याचे रिक्त जागेनुसार पदोन्नतीच्या कक्षेत येत असल्याने त्यांना पदोन्नती देय ठरते.

३. पोलीस दलातील पोलीस उप निरीक्षक हे पद गट-ब (अराजपत्रीत) या दर्जाचे आहे व पदोन्नतीकरिता पात्र झालेले पोलीस अंमलदार हे पोलीस उप निरीक्षक गट-ब (अराजपत्रीत) या पदावर पदोन्नतीने नियुक्त केले जाणार आहे. त्यामुळे शासन अधिसूचना-महाराष्ट्र शासकीय गट "अ" व गट "ब" (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम,२०२१, दि.१४/०७/२०२१ या प्रकरणी लागु होतात. करिता सदरहु पात्र अंमलदाराकडून महसुली विभागाची पसंती घेण्यात आली आहे.

४. सदरहु नियमावलीतील पदोन्नतीने नियुक्तीकरिता नियम ११ (२) अन्वये महसुल वाटपाचे अधिकार विभाग प्रमुख यांना प्रदान करण्यात आले आहे. सदर अधिकाराचा वापर करुन महसुल विभाग वाटप करण्यात आले आहेत.

५. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२-न च्या तरतुदी नुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन, खालील नमूद पोलीस अंमलदारांना स्थानापन्न २५ टक्के कोट्यातील नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक गट-ब (अराजपत्रीत) या पदावर आस्थापना मंडळ क्र.२ च्या मान्यतेनुसार नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक या पदावर त्यांचे नावासमोरील रकाना क्र. ५ मध्ये दर्शविण्यात आलेल्या घटकात पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे :-

| अ. क्र. | अर्हता प्राप्त पोलीस अंमलदारांचे नाव | सध्याची नियुक्ती | वाटप झालेला महसूल विभाग | पो.उ.नि.पदी पदोन्नतीवर नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | सपोउपनि / ८४३ ज्ञानेश्वर नामदेव आवाळे | पुणे शहर | पुणे विभाग | पुणे शहर |

६. महाराष्ट्र शासन, सा.प्र.विभाग निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१ मधील नमूद विशेष अनुमती याचीका क्र.२८३०६/२०१७ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे अधिन राहून पदोन्नती देण्यात येत आहे.

७. सदर अंमलदाराबाबतीत,

१) गुन्हा दाखल झाला असेल किंवा गुन्ह्याचा दोषारोप न्यायालयात पाठविला असेल,

२) निलंबन करण्यात आले असेल,

३) शिक्षा प्रस्तावित किंवा प्रलंबित किंवा चालू असेल तर त्यांना त्यांना पदोन्नतीवर न सोडता, त्यांच्या विरुद्धच्या संबंधित प्रकरणांची सविस्तर माहिती या कार्यालयास ई-मेलद्वारे / फॅक्सद्वारेतात्काळ पाठवावी व पुढील आदेशाची वाट पहावी.

८. जर संबंधित घटकामध्ये निवडणूकीची प्रक्रिया सुरु असल्यास किंवा त्या अनुषंगाने आचारसंहिता सुरु असल्यास घटक प्रमुखांनी त्याबाबत संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांशी संपर्क साधून, आचारसंहितेचा भंग होणार नाही, त्यानुषंगाने कार्यवाही करावी.

९. मा.भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली कडील दि.३१/०७/२०२४ अन्वये निर्गमित केलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्याची दक्षता घ्यावी.

१०. सदर पदोन्नती आदेशातील पोलीस अंमलदाराला पोलीस उपनिरीक्षक पदावर तात्काळ हजर करुन घ्यावे व तसे या कार्यालयास न चुकता कळवावे, ही विनंती.

११. सदर आदेश http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर FLASH या शिर्षाखाली देखील उपलब्ध होतील.

१२. पदोन्नत पोलीस अंमलदाराचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

30/09

( के. एम. मल्लिकार्जुन प्रसन्ना )
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, पुणे शहर

**प्रत सविनय सादर,**

अपर मुख्य सचिव (गृह), गृहविभाग, महाराष्ट्र शासन, २ रा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई- ३२.
महालेखापाल-१, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

**प्रत:-**

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक यांचे कार्यालय.

२. सदरचे आदेश संकेतस्थळावर "स्थानापन्न पोलीस उप निरीक्षक पदी पदोन्नती-२०२४ (अर्हता-२०१३)- **Officiating PSI Promotion Order-२०२४ (Qualifying Exam.२०१३)"** या मथळ्याखाली ३० दिवसांकरिता प्रसिद्ध करण्यात यावे.

कार्यालय अधीक्षक, का. क्र. ४, ६, ९, ३२, ३६ व ४० (पोमसं कार्यालय). /का.क्र.५ प्रमुख लिपिक (सेवाजेष्ठताकरीता).